MHSN120002862024

दाखल दिनांक – १८.०४.२०२४
नोंदणी दिनांक – १८.०४.२०२४
निकाल दिनांक – २१.०५.२०२६
कालावधी – ०२ वर्ष, ०१ महिना, ०३ दिवस.

पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)

नियमित फौजदारी खटला क्र.३५/२०२४

नि.क्र.

**अभियोग पक्ष** — **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक,
**भिलवडी पोलीस ठाणे.**

**अभियोग पक्षातर्फे** — श्री.आर.आर. चांगण, सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** — **१. विनायक विठ्ठल यादव,**
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती,
**२. वैभव उर्फ रोहन विनायक यादव,**
वय – २८ वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा.हजारवाडी, ता.पलूस, जि.सांगली.

**आरोपींतर्फे वकील** — श्री.एच.ए. गायकवाड.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | १६.०२.२०२४ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | २३/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १८.०४.२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १८.०४.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | १८.०४.२०२४ |
| युक्तिवाद दिनांक | | २१.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २१.०५.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु–क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा–तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.क. ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२. | विनायक विठ्ठल यादव,<br><br>वैभव उर्फ रोहन विनायक यादव, | फौ.प्र.सं.कलम ४१/अ प्रमाणे नोटीस दिली. | १८.०४.२०२४ | भा.दं.वि.क. ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## <u>अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी</u>

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | संजय दत्तात्रय यादव | २७ | फिर्यादी |
| २. | प्रथमेश संजय यादव | ३१ | साक्षीदार |
| ३. | प्रसन्न संजय यादव | ३२ | साक्षीदार |

**अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.२८ व २९ | फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील सहीपुरती निशाणी |
| २. | नि.३३ | घटनास्थळ पंचनामा आरोपीतर्फे मान्य करण्यात आला. |
| ३. | नि.३४ व ३५ | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीतर्फे मान्य करण्यात आले. |

**– न्यायनिर्णय –**

**(घोषणा तारीख– २१.०५.२०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ या अपराधांसाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी संजय दत्तात्रय यादव याने दि.१६.०२.२०२४ रोजी फिर्याद देवून असे कथन केले की, त्यांचा मुलगा प्रसन्न याने हजारवाडी ग्रामपंचायतमध्ये गेले चार महिन्यापूर्वी गावात मंजूर झालेली विकास कामे गावातील सुशिक्षित बेरोजगार स्थानिक तरुण मुलांना देण्यात यावे असा अर्ज दिला होता. त्यानंतर गावात मंजूर झालेली सर्व कामे कोणतीही कायदेशिर प्रक्रिया न करता बाहेरील कॉन्ट्रॅक्टरला देण्यात आले. ग्रामपंचायत हजारवाडीला जनसुविधा जिल्हा परिषद सांगली यांचेकडून पाच लाख रुपयेचा निधी मंजूर करण्यात आला होता व त्या कामाबाबत प्रसन्न हा दि.१५.०२.२०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, हजारवाडी येथे गेला असता त्याची ग्रामपंचायत सदस्य वैभव यादव याने उडवाउडवीची उत्तरे देवून अरेरावीची भाषा वापरली त्यामुळे त्यांच्यात किरकोळ वादावादी झाली होती.

**३.** दि.१६.०२.२०२४ रोजी सकाळी ११–०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्याचा मुलगा प्रथमेश मोटरसायकलवरुन शेतीची कामे आटपून

हजारवाडी गावाच्या कमानीजवळ त्यांच्या नवीन घराचे बांधकामाजवळ येवून थांबले. त्यानंतर ते जुन्या घरी जाण्यास निघाले त्यावेळेस रस्त्यावर सुरेश माने याच्या पानशॉप समोर आरोपी वैभव व विनायक यांनी यापुर्वी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरुन मोटरसायकल थांबविण्याच्या उद्देशाने 'तुम्हा बाप लेकाला मस्ती आली आहे, तुम्ही आमची गावात लायकी काढायला लागला आहात' असे सांगून त्यांच्या अंगावर येवून मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी विनायक याने लोखंडी पाईपने त्यांच्या डोक्यात मारले. त्यावेळेस प्रथमेश याचा ओरडण्याचा आवाज ऐकून प्रसन्न त्याठिकाणी आला व भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपी रोहन याने प्रथमेश व प्रसन्न यांना खाली पाडून हाताने व लाथबुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सुरेश माने, अभिजीत यादव, सुरेंद्र सुर्यवंशी, सचिन चंदुगडे यांनी भांडण सोडविले त्यानंतर तक्रार देण्याकरिता पोलीस ठाणेत गेले असता पोलीसांनी उपचाराकरिता पाठविले. त्यानंतर त्यांनी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

**४.** सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर २३/२०२४ ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**५.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींवर भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.१०) ठेवून तो त्यांना वाचून दाखवला असता त्यांनी त्यांचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. सुनावणी दरम्यान फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेबाबत संयुक्तिक पुरसिस (निशाणी क्र.२६) दिली आहे. सबब, अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन वगळण्यात आले.

**६.** सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

**७.** अभिलेख, पुरावे व उभयबाजूंचा युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१६.०२.२०२४ रोजी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्यात मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचविली व त्याअन्वये त्यांनी भा.दं.वि.सं.चे कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | ... **नकारार्थी** |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करून साक्षीदाराला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केली व त्याअन्वये त्यांनी भा.दं.वि.सं.चे कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | ... **नकारार्थी** |
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन अपमानीत केले त्याअन्वये त्यांनी भा.दं.वि.सं.चे कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | ... **नकारार्थी** |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदारास उद्देशपुर्वक फौजदारीपात्र धाकधपटशा केले व त्याअन्वये त्यांनी भा.दं.वि.सं.चे कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा | ... **नकारार्थी** |

केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

५. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## –कारणमिमांसा–

### मुद्दा क्र.१ ते ४ करिता –

८. आरोपींवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लोखंडी रॉडने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचविली तसेच, साक्षीदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिध्द करणे आवश्यक होते. सदरच्या बाबी सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ ते ३ यांच्या साक्षीवर भिस्त ठेवली आहे. साक्षीदार क्र.१ याने फिर्यादी या नात्याने साक्ष दिली असून आरोपींसोबत ग्रामपंचायतच्या निधीवरुन वादावादी झाल्याचे कथन केले आहे. त्याने नि.क्र.२८ व २९ प्रमाणे फिर्याद व प्रथम खबर अहवाल दिला असल्याचे मान्य केले असले तरीही त्यातील मजकूर नाकारला आहे. साक्षीदार क्र.२ व ३ यांनी देखील आरोपीसोबत दीड वर्षापूर्वी ग्रामपंचायतच्या निधीवरुन वादावादी झाल्याचे कथन केले आहे परंतु, घटनेबाबत काहीही कथन केले नाही. साक्षीदार क्र.१ ते ३ अभियोग पक्षास पुरक साक्ष न दिल्याने सहा.सरकारी वकीलांनी साक्षीदारास भारतीय साक्ष पुरावा कायदाचे कलम १५४ अन्वये उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारले परंतु आरोपींवरील गुन्हा शाबीत होईल असे कोणतेही कथन पटलावर आले नाही.

९. आरोपी तर्फे घटनास्थळ पंचनामा नि.क्र.३३ व वैद्यकीय प्रमााणपत्र नि.क्र.३४ व ३५ प्रमणे मान्य करण्यात आले असले तरीही सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लोखंडी रॉडने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचविली तसेच, साक्षीदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिध्द झाल्याचे

ग्राह्य धरता येणार नाही. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी तथाकथित घटनेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच, त्यांनी न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले असून तशी नि.क्र.२६ प्रमाणे तडजोड पुरसिस पटलावर सादर केली असल्याने कदाचित फिर्यादी व साक्षीदारास प्रस्तुतचे प्रकरण चालविण्यास स्वारस्य दिसून येते आहे.

**१०.** फिर्यादी अभियोगपक्षाच्या कथनेस सहकार्य होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. स्वतः फिर्यादीनेच अभियोगपक्षाच्या कथनेस समर्थन केलेले नाही. अशा परिस्थितीत, फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने सिध्द झालेले नाही. फिर्यादीने त्याच्या साक्षीपुराव्यादरम्यान प्रस्तुत प्रकरणामध्ये त्याचेमध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर **निशाणी क्र.२६** प्रमाणे तडजोड झाली असल्याचे देखील मान्य केलेले आहे.

**११.** आरोपींविरुध्द कोणताही दोषदर्शक असा पुरावा पटलावर आलेला नाही. आरोपींवर ठेवलेले आरोप निःशंखपणे सिध्द करण्याकरिता आवश्यक असणारा सबळ, ठोस व स्वतंत्र असा साक्षीपुरावा अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला नाही. कथित घटना व त्यामधील आरोपींचा दोषदर्शक सहभाग निःशंखपणे सिध्द होत नाही. फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन सिध्द झालेले नाही. सर्व आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लोखंडी रॉडने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचविली तसेच, साक्षीदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या सर्व बाबी अभियोग पक्षाने निःशंखपणे सिध्द केलेल्या नाहीत. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करिता –</u>**

**१२.** जप्त मुद्देमाल एक लोखंडी पाईप याची अपिल कालावधी

संपल्यानंतर फौ.प्र.सं. कलम ४५२ अन्वये जाहीर लिलाव करुन त्याची येणारी रक्कम सरकार जमा करण्याचे आदेश करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

**१३.** उपरोक्त चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ ते ४ वरील माझ्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे निष्पन्न होते की, अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवलेले दोषारोप निःशंखपणे सिध्द केलेले नाहीत. करीता, आरोपी क्र.१ व २ हे प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष सुटण्यास पात्र ठरत आहे. अंततः, मुद्दा क्र.५ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

**१.** आरोपी क्र.१ विनायक विठ्ठल यादव आणि आरोपी क्र.२ वैभव उर्फ रोहन विनायक यादव यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ च्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करणेत येतात.

**३.** जप्त मुद्देमाल एक लोखंडी पाईप याची अपिल कालावधी संपल्यानंतर फौ.प्र.सं. कलम ४५२ अन्वये जाहीर लिलाव करुन त्याची येणारी रक्कम सरकार जमा करण्यात यावे.

**४.** आरोपींनी फौ.प्र.संहितेचे कलम ४३७–अ अंतर्गत वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.05.21 16:56:06 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक– २१.०५.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस.**

<u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 21.05.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 21.05.2026 |
| Judgment uploaded on | : | 21.05.2026 |